# १२. राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय रस्ता सुरक्षा व समन्वय समिती

मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम २१५ नुसार रस्तासुरक्षितता समिती केंद्र शासन स्तरावर/राज्य शासन स्तरावर व जिल्हा स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या आहेत. रस्ते अपघात - कारणे व उपाययोजना तसेच तत्संबंधी उपस्थित होणारे प्रश्न यांचा सर्वंकष अभ्यास करण्याच्या दृष्टीकोनातून केंद्र शासनाने राष्ट्रीय रस्ता सुरक्षा समिती गठीत केली आहे. याच धर्तीवर परिवहन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय रस्ता सुरक्षा समिती आणि त्या अनुषंगाने जिल्हास्तरीय रस्ते सुरक्षा समिती गठीत करण्याविषयी केंद्र शासनाने सर्व राज्य शासनांस सुचविले होते, की ज्यायोगे रस्ता सुरक्षितता विषयक उपाययोजना आखून त्यांची अंमलबजावणी करता येईल.

रस्ता सुरक्षितता समितीमध्ये रस्त्यावरील अपघातांना आळा घालण्याच्या दृष्टीने वेगवेगळया उपाययोजना केल्या जातात व याबाबत जनतेकडून कांही सूचना व जनतेचा सहभाग आवश्यक असतो. यास अनुसरुन गृह विभाग, महाराष्ट्र शासन, यांनी त्यांचे ठराव क्र. एमव्हीए १०८७/३१६, परि-२, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ५ ऑगस्ट, १९८७ नुसार राज्य स्तरीय रस्ते सुरक्षा परिषद व जिल्हा स्तरीय रस्ते सुरक्षा समिती गठीत करण्यात आली आहे.

## (अ) राज्य स्तरीय सुरक्षा परिषद खालीलप्रमाणे आहे

(१) मंत्री (परिवहन) ... अध्यक्ष

(२) राज्यमंत्री (गृह) ... सदस्य

(३) राज्यमंत्री (पर्यटन व सार्वजनिक बांधकाम विभाग) सदस्य

(४) अतिरिक्त मुख्य सचिव ... सदस्य

(५) विशेष सचिव (गृह) ... सदस्य

(६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई ... सदस्य

(७) सचिव (परिवहन) ... सदस्य

(८) सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) ... सदस्य

(९) सचिव (शिक्षण) ... सदस्य

(१०) उप अधिष्ठाता, मुंबई युनिव्हर्सिटी ... सदस्य

(११) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ. ... सदस्य

(१२) महापालिका आयुक्त, मुंबई महानगरपालिका ... सदस्य

(१३) संचालक, सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट ... सदस्य

(१४) पोलीस आयुक्त, मुंबई ... सदस्य

(१५) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई ... सदस्य सचिव

(१६) अतिरिक्त पोलीस आयुक्त (वाहतूक) ... सदस्य

परिषदेच्या बैठकीकरिता खालीलप्रमाणे विशेष निमंत्रित असतील :—

**विशेष निमंत्रित :**

(१) सचिव (उपनगर विकास)

(२) सचिव (पर्यटन)

(३) सचिव (आरोग्य)

(४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई.

(५) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई.

(६) महानगर आयुक्त, मुंबई महानगर विभाग विकास प्राधिकारण, मुंबई. (एम.एम.आर.डी.ए.)

(७) अध्यक्ष, वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोशिएशन, ७६, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई.

(८) संचालक, मुंबई दुरदर्शन केंद्र, वरळी,मुंबई-४०० ०२५.

(९) अध्यक्ष, महाराष्ट्र ट्रक ओनर्स असोशिएशन, २१०, २ रा मजला, ट्रिपनेक्स हाऊस, १५ सोलापूर स्ट्रीट, मुंबई-४०० ००९.

राज्य स्तरीय रस्ते सुरक्षा परिषदेने नियतकालिक बैठकांचे आयोजन करावे. सदर बैठकांमध्ये रस्ते सुरक्षिततेच्या उपाययोजनासंबंधी अंतिम आराखडा तयार करुन त्यांच्या अंमलबजावणी कार्यवाही व नियोजन कार्यप्रणाली विषयक मुद्दयांचा आढावा घ्यावा. या प्रकारच्या कामकाजाचा उपरोक्त ठरावात उल्लेख करण्यात आला आहे.

## (ब) जिल्हा स्तरीय रस्ते सुरक्षा समिती खालीलप्रमाणे आहे

(१) जिल्हाधिकारी ... अध्यक्ष

(२) पोलीस अधिक्षक किंवा पोलीस उप आयुक्त (वाहतूक) सदस्य

(३) कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग) ... सदस्य

(४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ... सदस्य

(५) विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सदस्य

(६) सिव्हील सर्जन ... सदस्य

(७) नगरपरिषदेच्या जिल्हा मुख्यालयाचे मुख्य अधिकारी किंवा नगर पालिकेचे उप आयुक्त. सदस्य

(८) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ... सदस्य सचिव

## (क) मोटार वाहन चालक प्रश्न सोडविण्याकरीता जिल्हास्तर समिती

(१) अध्यक्ष ... संबंधित प्रादेशिक परिवहन अधिकारी

(२) सदस्य ... पोलीस अधिक्षक किंवा पोलीस आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेला राजपत्रित दर्जाचा पोलीस अधिकारी.

(३) सदस्य ... जिल्हा स्तरावरील टॅक्सी, ऑटोरिक्षा, ट्रक, टँकर व बस चालकांच्या संघटनेचे प्रत्येकी एक प्रतिनिधी यामध्ये एकापेक्षा अधिक संघटना असतील तर ज्यांच्या सभासदांची संख्या जास्त आहे अशा संघटनेचा प्रतिनिधी.

(४) सदस्य सचिव जिल्ह्यातील उप प्रादेशिक परिवहन अधिकारी.

## (ड) प्रवाशांच्या सोईकरीता स्थापन झालेल्या समन्वय समितीबाबत.

(१) वरील समितीमध्ये खालील प्रमाणे पदे भरली जातात.

| | | |
|---|---|---|
| (अ) पोलीस आयुक्त (मुख्यालय) | ... | अध्यक्ष |
| (ब) वाहतूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ. | ... | सदस्य |
| (क) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी | ... | सदस्य/सचिव |
| (ड) पोलीस निरीक्षक, वाहतुक नियंत्रण शाखा | | निमंत्रित सदस्य |
| (इ) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग. | | निमंत्रित सदस्य |
| (ई) प्रवाशी संघटना प्रतिनिधी | ... | सदस्य |

**समितीची कामे :**

(१) रिक्षा/टॅक्सी स्टँड बनविणे व नो पार्किंग चे बोर्ड बसविणे.

(२) रस्ता रुंदीकरण/खड्डे बुजविणे/बस स्टॉप नवीन बनविणे.

(३) स्पीड ब्रेकर्स व इतर वाहतूक चिन्हांचे फलक बसविणे.

(४) सिग्नल बसविणे व पीयुसी/लायसन्स/वाहनांचे पुस्तिका तपासणे व त्याबाबतची कारवाई.

(५) चोरटी प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहन चालक/मालक यांचेवर कारवाई करणे.

(६) रिक्षा/टॅक्सी चालकांचे बिल्ले/युनिफॉर्म/ट्रॅफिक कार्ड यावर देखरेख करणे.

(७) नवीन रुटसाठी बसची सोय/यात्रेसाठी बसची सोय करणे.